# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

नवी मुंबई

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**2022 .**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई. | कक्ष - २ | दिनांक १५/०९/२०२२ |
|---|---|---|

## प्रवासी म्हणून प्रवास करताना वाहन चालकांस चाकुचा धाक दाखवून जबरी चोरी करणारा गुन्हेगार गुन्हे शाखा कक्ष २ कडुन जेरबंद

--------------------------------------------------------------------------------

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये नवी मुंबई व रायगड जिल्हयात ऑगष्ट महिन्याच्या सुरवातीस प्रवासी म्हणून वाहनात बसून प्रवास करीत असताना अचानक काहीतरी बहाणा करुन वाहन थांबवून वाहन चालकांस चाकुचा धाक दाखवून त्याची कार व रक्कम जबरीने लुटणा-या गुन्हेगारास गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल यांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून अशा प्रकारचे एकुण ०२ गुन्हे उघडकीस आणुन गुन्हयात चोरीस गेलेली १०,००,०००/- रूपये किंमतीची एर्टीगा कार हस्तगत केली आहे.

नवी मुंबई व रायगड जिल्हयात ऑगष्ट महिन्याच्या सुरवातीस प्रवासी म्हणून वाहनात बसून प्रवास करीत असताना अचानक काहीतरी बहाणा करुन वाहन थांबवून वाहन चालकांस चाकुचा धाक दाखवून त्याची कार व रक्कम जबरीने लुटून नेल्याबाबतचे काही गुन्हे नवी मुंबई आयुक्तालयात दाखल झाले होते. पुणे-मुंबई एक्सप्रेस वे वरील प्रवाशी व वाहनचालकांना पोलीसांविषयी विश्वास व प्रवासादरम्यान सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी सदरचे गुन्हे उघडकीस आणन्याबाबत मा.पोलीस आयुक्त, श्री.बिपीनकुमार सिंह, मा.सह.पोलीस आयुक्त, डॉ.श्री.जय जाधव, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.महेश घुर्ये, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री सुरेश मेंगडे यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या वेगवेगळया टिम तयार करण्यात आल्या होत्या.

गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद गुन्हयांतील घटनास्थळ, आरोपींच्या येण्याजाण्याच्या मार्गावरील सीसीटिव्ही कॅमेरे, तांत्रिक तपास व गोपनिय बातमीदार यांच्या मार्फत गुन्हे शाखा कक्ष २ चे अधिकारी व अंमलदार तपासकरीत असताना पोलीस उप निरीक्षक मानसिंग पाटील यांना मिळालेल्या बातमी अन्वये खालील आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे.

**<u>ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव -</u>**

**१) महेंद्रप्रताप उर्फ अंकीत ग्यानेंद्र सिंह, वय - ३१ वर्षे, रा. बिल्डींग क्र. १९, रुम नं. ०९, केएल ४, सेक्टर ४, कळंबोली मुळ रा. सातो जोगा, पोस्ट - खागा, तह. फतेहपुर जि. फतेहपुर राज्य - उत्तर प्रदेश**

नमुद आरोपी हा त्याचे इतर ०३ साथीदार गुन्हयातील पाहिजे आरोपी याच्यासह सदरचे गुन्हे करत असल्याबाबत कबुली दिली आहे.

नमुद आरोपीकडुन गुन्हे शाखा कक्ष २ यांनी १०,००,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन ०२ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर आरोपीस पुढील कार्यवाही साठी कळंबोली पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उत्कृष्ट कारवाई नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष २, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गिरीधर गोरे, सपोनि. संदिप गायकवाड, सपोनि. प्रविण फडतरे, पोउपनि. वैभव रोंगे, पोउपनि. मानसिंग पाटील, पोउपनि/सुदाम पाटील, पोहवा/१०३४ ज्ञानेश्वर वाघ, पोहवा/१३४३ मधुकर गडगे, पोहवा/४२० सचिन पवार, पोहवा/१७३२ अनिल पाटील, पोहवा/४४ तुकाराम सुर्यवंशी, पोहवा/१३३९ प्रशांत काटकर, पोहवा/१९३ रणजित पाटील, चापोहवा/१९३० राजेश बैकर, पोना/१७९९ निलेश पाटील, पोना/२०८२ इंद्रजित कानु, पोना/२००५ सचिन म्हात्रे, पोना/१७३८ दिपक डोंगरे, पोना/४४१३ आजिनाथ फुंदे, पोना/२३३४ प्रफुल्ल मोरे, पोना/२२५६ राहुल पवार, पोशि/१२५९३ संजय पाटील, पोशि/३५७७ प्रविण भोपी, पोशि/४३१७ विक्रांत माळी यांनी केली आहे.

## - अटक आरोपींकडुन उघडकीस आणलेले ०२ गुन्हे -

१) खालापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २४७/२०२२ भादवि.कलम ३९४, ३९७, ३४ अन्वये

२) कळंबोली पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. १७१/२०२२ भा.द.वि. कलम ३९२, ३४ अन्वये

## अटक आरोपींचा पुर्व इतिहास -

### महेंद्र प्रताप उर्फ अंकित सिंह याचे विरुध्द् दाखल असलेले गुन्हे

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | मानपाडा पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ७४३/२०१८ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| २ | मानपाडा पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ७३८/२०१८ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| ३ | मानपाडा पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ७४७/२०१८ भा.द.वि. कलम ३९९, ४०२, ३४ |
| ४ | समतानगर पोलीस ठाणे (बृन्हमुंबई शहर) | ८९९/२०१८ आर्म ॲक्ट ३, २५ |
| ५ | एनआरआय सागरी पोलीस ठाणे | ३०९/२०१८ भादवि कलम ३९४, ३४ आर्म ॲक्ट ३, २५ महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१), १३५ |